Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# “ऑनलाइन शिक्षण पद्धती आणि आजचा विद्यार्थी यांचा विश्लेषणात्मक अभ्यास”

**डॉ. भाग्यश्री दिनेश पाटील**
सहाय्यक प्राध्यापक,
श्री.शि.वि.प्र. संस्थेचे कला आणि वाणिज्य महाविद्यालय, धुळे.
bhagyashripatil759@gmail.com ,
Mob.No.9764287436

**प्रस्तावना-**

जगामध्ये मनुष्याने अनेक रोगांचा सामना केला आहे. पण आज संपूर्ण जगात एका अशा विषाणूने थैमान घातले की ज्यामुळे संपूर्ण जगाची झोप उडाली आहे. लोकांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे सर्वांचे जीवन जगणे कठीण बनले आहे. या वायरसच नाव आहे कोरोना व्हायरस. covid-19 (करोना व्हायरस) हा असा विषाणू आहे जो आपल्याला डोळ्यांनी दिसु शकत नाही. हा एक अतिसूक्ष्म विषाणू आहे. ज्याला या आधी कधी पाहिलं गेलं नव्हतं सर्वात प्रथम या विषाणूचा संसर्ग डिसेंबर 2019 चीन मधील वुहान या शहरात झाला. त्यानंतर या विषाणूचे नाव कोरोना व्हायरस ठेवण्यात आले. करोना विषाणूच्या संसर्गामुळे या रोगाची लागण होते. त्या रोगाचे नाव covid-19 ठेवण्यात आले. हा विषाणू खूप घातक आहे या विषाणूमुळे संपूर्ण दुनियेतील अनेक लोकांना याची बाधा झाली आहे आणि लाखाहून अधिक लोकांना जीव गमवावा लागला आहे.

कोरोना व्हायरस विरुद्ध लढण्यासाठी रात्रंदिवस पोलीस, सैनिक, डॉक्टर, नर्स, सफाई कर्मचारी, जनसेवक प्रयत्न करत आहेत. खरोखरच आपणास या रोगाला संपवायचे असेल तर लॉकडाउन हा शेवटचा पर्याय आहे. संपूर्ण जगासमोर निर्माण झालेला प्रश्न सोडविण्यासाठी जगात लॉकडाउन करण्याची वेळ आली. संपूर्ण व्यवहार जे काय आहे ते बंद करण्यात आले. यामध्ये सामाजिक, राजकीय, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रांमध्ये चालणारे दररोजचे व्यवहार, देवाण-घेवाण, व्यक्ती व्यक्ती मधील संपर्क हा थांबविण्यात आला आणि याचाच परिणाम हा शैक्षणिक क्षेत्रावर सुद्धा घडून आलेला दिसत आहे. सर्व शाळा, महाविद्यालय बंद करण्यात आले आणि शिक्षणाचा प्रवाह विद्यार्थ्यांपर्यंत सतत पोहोचत राहावा यासाठी ऑनलाईन शिक्षणपद्धती या पद्धतीचा सर्वत्र अवलंब केला गेला. भारतात देखील लॉकडाउन केले असता मोठ्या प्रमाणावर ऑनलाइन शिक्षणाची सुविधा निर्माण करण्यात आली. या ऑनलाईन शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांची भूमिका काय आहे? विद्यार्थ्यांचं मत काय आहे? विद्यार्थी आणि ऑनलाइन शिक्षण यामधील संबंध हे जाणून घेण्यासाठी या संशोधन विषयाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**उद्देश =**

1. ऑनलाईन शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना माहिती व ज्ञानाचे स्त्रोत निर्माण झाले आहेत याचा अभ्यास करणे.
2. ऑनलाइन शिक्षण पद्धती ही विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या परवडणारी आहे याचा अभ्यास करणे.
3. ऑनलाइन शिक्षणात विद्यार्थ्यांना अनेक तांत्रिक व यांत्रिक अडचणी निर्माण झाल्या आहेत.
4. ऑनलाईन शिक्षण पद्धतीत विद्यार्थी पुर्णतः समाधानी आहेत याचा अभ्यास करणे.

**गृहीत कृत्य =**

1. ऑनलाईन शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना माहिती व ज्ञानाचे स्त्रोत निर्माण झाले आहेत.
2. ऑनलाइन शिक्षण पद्धती ही विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या परवडणारी आहे.
3. ऑनलाइन शिक्षणात विद्यार्थ्यांना अनेक तांत्रिक व यांत्रिक अडचणी निर्माण झाल्या आहेत.
4. ऑनलाईन शिक्षण पद्धतीत विद्यार्थी पुर्णतः समाधानी आहेत.

**नमुना निवड =**

महाविद्यालयात प्रवेशित असणाऱ्या पदवी व पदव्युत्तर वर्गातील एकुण विद्यार्थी संख्या 740 असून त्यापैकी 50 टक्के म्हणजे 370 विद्यार्थ्यांची नमुना म्हणून निवड करण्यात आली आहे.

**क्षेत्र, कालावधी व व्याप्ती** =

संशोधन विषयाचे क्षेत्र म्हणून महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे कला आणि वाणिज्य महाविद्यालय, धुळे याची निवड करण्यात आली आहे. संशोधनाचा कालावधी हा साधारणपणे मार्च 2020 ते मार्च 2021 हा निश्चित करण्यात आला आहे.

**माहिती मिळविण्याचे साधन=**

संशोधन विषया संदर्भात विद्यार्थ्याकडून माहिती व अभिप्राय मिळविण्यासाठी प्रश्नावली तयार करण्यात आली आहे. व या प्रश्नावलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन पद्धतीने माहिती मिळविण्यात आली ,प्रश्नावली भरून घेण्यात आली.

**संशोधनाची मर्यादा =**

या संशोधन विषयात फक्त एस एस वी पी एस महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**स्पष्टीकरण =**

"ऑनलाइन शिक्षण पद्धती आणि आजचा विद्यार्थी यांचा विश्लेषणात्मक अभ्यास" या विषया संदर्भात महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर वर्गाच्या विद्यार्थ्यांकडून प्रश्नावली भरून घेण्यात आली. या विद्यार्थ्यांनी आपली मते नोंदवली असून ती पुढीलप्रमाणे आहेत.

1.ऑनलाईन शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना माहिती व ज्ञानाचे स्त्रोत निर्माण झाले आहेत.

| | सहमत | असहमत | तटस्थ | एकूण |
|---|---|---|---|---|
| विद्यार्थी संख्या | 264 | 63 | 43 | 370 |
| शेकडा प्रमाण | 71.4 | 17.0 | 11.6 | 100 |

ऑनलाईन शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना माहिती व ज्ञानाचे स्त्रोत निर्माण झाले आहेत असा प्रश्न विद्यार्थ्यांना विचारला असता, 71.4 % विद्यार्थ्यांनी आपली सहमती दर्शवली आहे. 17% विद्यार्थ्यांनी ऑनलाईन शिक्षणाबद्दल असहमती दर्शविली आहे. आणि 13.00% विद्यार्थी यापासून तटस्थ भूमिका दर्शवितात.

2. ऑनलाइन शिक्षण पद्धती ही विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या परवडणारी आहे.

| | सहमत | असहमत | तटस्थ | एकूण |
|---|---|---|---|---|
| विद्यार्थी संख्या | 180 | 121 | 69 | 370 |
| शेकडा प्रमाण | 48.6 | 32.7 | 18.6 | 100 |

ऑनलाइन शिक्षण पद्धती ही विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या परवडणारी आहे , असा प्रश्न विद्यार्थ्यांना विचारला असता, एकूण नमुन्यांपैकी 48.6 % विद्यार्थ्यांनी आपली सहमती दर्शविली आहे, तर 32.7 % विद्यार्थ्यांनी आपली असहमती दर्शविली असून, 18.6 टक्के विद्यार्थी या प्रश्नाबद्दल आपली तटस्थ भूमिका दर्शवितात.

3. ऑनलाईन शिक्षण पद्धतीत विद्यार्थी पुर्णतः समाधानी आहेत.

| | सहमत | असहमत | तटस्थ | एकूण |
|---|---|---|---|---|
| विद्यार्थी संख्या | 141 | 153 | 76 | 370 |
| शेकडा प्रमाण | 38.1 | 41.4 | 20.5 | 100 |

ऑनलाईन शिक्षण पद्धतीत विद्यार्थी पुर्णतः समाधानी आहेत असा प्रश्न विद्यार्थ्यांना विचारला असता एकूण नमुन्याच्या 38.1% विद्यार्थी या मताशी सहमत असून, 41.4 % विद्यार्थी असहमत आहेत, तर 20.5 टक्के विद्यार्थी हे तटस्थ आहेत.

4. ऑनलाइन शिक्षणात विद्यार्थ्यांना अनेक तांत्रिक व यांत्रिक अडचणी निर्माण झाल्या आहेत.

| | सहमत | असहमत | तटस्थ | एकूण |
|---|---|---|---|---|
| विद्यार्थी संख्या | 264 | 67 | 39 | 370 |
| शेकडा प्रमाण | 71.4 | 18.1 | 10.5 | 100 |

ऑनलाइन शिक्षणात विद्यार्थ्यांना अनेक तांत्रिक व यांत्रिक अडचणी निर्माण झाल्या आहेत असा प्रश्न विचारला असता, एकूण नमुन्याच्या संख्येपैकी 71.4% विद्यार्थी या मताशी सहमत असून, 18.1% विद्यार्थी यामताशी असहमत आहेत, तर 10.5% टक्के विद्यार्थ्यांनी आपली त्रयस्थ, तटस्थ अशी भूमिका दर्शविली आहे.

**निष्कर्ष=**

1. ऑनलाईन शिक्षण पद्धतीमुळे विद्यार्थ्यांना अनेक ज्ञानाच्या शाखा माहित झाल्या आहे. विद्यार्थ्यांना एखाद्या घटका संबंधी माहिती मिळविण्यासाठी विविध प्रकारचे स्त्रोत किंवा मार्ग उपलब्ध झालेले आहेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानात भर पडली आहे.
2. ऑनलाईन शिक्षण पद्धतीमुळे येणारा खर्च हा अत्यंत मर्यादित आहे असे विद्यार्थ्यांना वाटते, त्यामुळे त्यांनी मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन शिक्षणाची पसंती दर्शविली आहे. ऑनलाईन शिक्षण हे विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या परवडणारे वाटते त्यामुळे त्यांच्या इतर खर्चामध्ये बचत झाली आहे.
3. ऑनलाइन शिक्षण पद्धतीबाबत विद्यार्थी पूर्णतः समाधानी नाही. त्याच्या बऱ्याच शंकांचे निरसन होत नाही तसेच त्याला पाहिजे तेवढा वेळ हा मिळत नाही. विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील संवाद त्याला अपूर्ण वाटतो, अभ्यास घटकातील सर्वच शंका या ऑनलाईन पद्धतीने स्पष्ट करता येत नाही व समजूनही घेता येत नाही . त्यामुळे विद्यार्थी ऑनलाइन शिक्षणाबाबत असमाधानी आहे.
4. ऑनलाइन शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना अनेक तांत्रिक यांत्रिक समस्यांना तोंड द्यावे लागते. मोठ्या प्रमाणावर त्यांच्याकडे यांत्रिक साधनांची उपलब्धता नसल्याकारणाने, इंटरनेटची सुविधा नसल्याने अनेक वेळा ज्ञानार्जन करण्यामध्ये अडथळे निर्माण झाले आहे. विद्यार्थ्याला अनेक यांत्रिक समस्या भेडसावत आहेत.

**संदर्भ =** प्रश्नावली